महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत सर्व राज्य कृषि विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता आणि इनक्युबेशन केंद्र (Artificial Intelligence Innovation & Incubation Centre AI^3) स्थापन करण्यासाठी निधी वितरीत करण्यास वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह -२०२५/प्र.क्र.१२३/१३-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ जुलै, २०२६

<u>संदर्भ</u>- १) शासन निर्णय क्रमांक: एआय-२०२५/प्र. क्र.१०६/१३-अे, दि.२४.०६.२०२५
२) शासन निर्णय क्रमांक: एआय-२०२५/प्र. क्र.१०६/१३-अे, दि.२५.०२.२०२६

<u>प्रस्तावना:</u>

महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत राज्यातील चार कृषि विद्यापीठांमध्ये संस्थात्मक स्तरावर एआय संशोधन, नाविन्यता व इनक्युबेशन पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यातील चार कृषि विद्यापीठांमध्ये "कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता व इनक्युबेशन केंद्रे (AI^3)" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये "कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता व इनक्युबेशन केंद्रे (AI^3)" केंद्राच्या नूतनीकरणांसाठी प्रत्येक कृषि विद्यापीठांसाठी रु. ५०.०० लक्ष इतका निधी याप्रमाणे एकूण रु. २ कोटी निधी वितरित करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती, आता या शासन निर्णयान्वये सदर निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय:</u>

१. महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत खालील चार राज्य कृषि विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता नाविन्यता आणि इनक्युबेशन केंद्र (Artificial Intelligence Innovation & Incubation Centre - AI^3) स्थापन करण्याकरिता प्रत्येकी रु.५०,००,०००/- (रुपये पन्नास लक्ष फक्त) याप्रमाणे एकूण रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	कृषि विद्यापीठाचे नाव	मंजूर निधी (रु. लक्ष मध्ये)
१	वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी	रु. ५०.०० लक्ष
२	महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी	रु. ५०.०० लक्ष
३	डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली	रु. ५०.०० लक्ष
४	डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला	रु. ५०.०० लक्ष
	एकूण	रु. २००.०० लक्ष (२ कोटी)

२. सदर खर्च "मागणी क्र.डी-३ , २४०१ - पीक संवर्धन,००-११३-कृषि अभियांत्रिकी,०१-महाराष्ट्र कृषि कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण ,(०१)(०१)-महाराष्ट्र कृषि कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण(१००% राज्य योजना)(२४०१ बी६८९)(कार्यक्रम) अंतर्गत ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) इतर खर्च या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर निधी कोषागारातून आहरित करण्याकरिता संबंधित विद्यापीठांचे सहायक लेखाधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. त्यांनी संबंधित उपशीर्षांतर्गत मंजूर करण्यात आलेले प्रत्येकी रु. ५०.०० लक्ष अनुदान आपापल्या कृषि विद्यापीठांच्या संबंधित नियंत्रक यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

४. कृषि विद्यापीठाने मंजूर केलेला निधी सदर शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या प्रयोजनासाठीच खर्च करावा.

५. कृषि विद्यापीठाने मंजूर करण्यात आलेले अनुदान महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९०, आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता १९९१ मधील तरतूदीप्रमाणे आणि प्रचलित शासन आदेश व विहित कार्यपध्दतीनुसार सक्षम अधिकाऱ्यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतल्यानंतर विहीत मर्यादेत खर्च करण्यात यावे. केवळ अर्थसंकल्पीय तरतूद आहे किंवा अनुदान वितरीत केले आहे म्हणून खर्च करु नये.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक.३१८/२०२६/व्यय-१, दि.२२.०६.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१५१२३१०९३९४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.07.15 12:31:51 +05'30'

(डॉ. ललितकुमार धायगुडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति-

१. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

४. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.

५. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/सहायक लेखाधिकारी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

६. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/सहायक लेखाधिकारी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

७. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/सहायक लेखाधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

८. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/सहायक लेखाधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

९. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.

१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.

११. जिल्हा कोषागार अधिकारी, दापोली उपकोषागार अधिकारी, दापोली

१२. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी कोषागार अधिकारी, परभणी.

१३. जिल्हा कोषागार अधिकारी, राहुरी कोषागार अधिकारी, राहुरी

१४. जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला उपकोषागार अधिकारी, अकोला

१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

१६. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.

१७. उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.

१८. उप सचिव/सह सचिव, वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.

१९. उप सचिव, नियोजन विभाग (१४३१), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२०. उप सचिव, कार्यासन २-अ, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२१. निवड नस्ती-१३-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.